जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८२४ दिनांक - २२/११/२०२३**

येरवडा पोलीस ठाणे पुणे शहर

## मोहसिन ऊर्फ मोबा बडेसाब शेख (टोळी प्रमुख) व त्याचे साथीदार याचेवर मकोका अंतर्गत कारवाई

यातील फिर्यादी व यातील मोहसिन ऊर्फ मोबा बडेसाब शेख (टोळी प्रमुख) हे एकमेकांचे नातेवाईक असुन,मोहसिन ऊर्फ मोबा बडेसाब शेख यांचा मुलगा आजारी असल्याने,तो जास्त त्रास असल्याने त्याने रागाचे भरात मी त्याला मारुन टाकतो असे बोलल्याने फिर्यादीं यांनी त्याची समजूत काढून,तुझ्या मुलाला मी सांभाळतो,तु काळजी करु नकोस असे म्हणुन फिर्यादींनी त्याचे मुलास पालन पोषना करीता घेवुन,ते त्याचा सांभाळ करीत असताना,मोबा उर्फ मोहसीन हा त्याचे मुलाला अधुन-मधुन घेऊन जावुन,त्याला त्रास देत असे त्यावेळी फिर्यादींनी त्यास असे का करतो असे विचारले असता,त्याने तु मला एक लाख रुपये दे,नाहीतर मुलाला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीं यांना व त्याच्या मुलाला तो मारुन टाकील या भितीने त्यांनी त्यास काही रोख रक्कम दिल्यानंतर तो निघुन गेला. त्यांनतर तो वारंवार फिर्यादीं यांना मारण्याची धमकी देऊन,त्यांचेकडे पैश्याची मागणी करून,फिर्यादी यांचे मोबाइलवर फोन करून,त्याचा साथीदार मोईन शेख याने फिर्यादी यांना शिवीगाळ करून,ते मोबाला का पैसे देत नाही,आम्हांला खर्चाला पैसे दे,नाही तर जिवत ठेवणार नाही अशी वारंवार धमकी देवुन,फिर्यादीस मानसिक त्रास दिल्याने फिर्यादी यांनी त्यांचेविरुद्ध येरवडा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने **येरवडा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.५९८/२०२३ भा.द.वि.कलम ३८६,३८७,५०४,५०७,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

दाखल गुन्हयातील निष्पन्न आरोपी नामे **१)मोबा उर्फ मोहसीन शेख (टोळी प्रमुख) २)मोईन काळु शेख (टोळी सदस्य)** हे दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी आहेत.

सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान मोबा उर्फ मोहसीन शेख (टोळी प्रमुख) व त्याचे साथीदार यांनी खुन करणे, खुनाचा प्रयत्न करणे, जबर दुखापत करणे, धाक दाखवून खंडणी मागणे, सरकारी कामात अडथळा आणून लोकसेवकास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, प्राणघातक हत्यारे जवळ बाळगणे, खुनाचे पुरावे नष्ट करणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे असे गंभीर गुन्हे केलेले आहेत. टोळीचा प्रमुख त्याने वेगवेगळे साथीदारांसह गंभीर गुन्हे केलेले आहेत. व त्याने येरवडा परीसरात दहशत निर्माण करून, आर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने परिसरात त्यांचे टोळीचे वर्चस्व वाढवण्यासाठी हिंसाचाराचा वापर करुन गंभीर गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने बेकायदेशिरपणे स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्या साठी सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२),३(४) प्रमाणे अंतर्भाव करण्यासाठी येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. बाळकृष्ण कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त परीमंडळ ०४ पुणे शहर श्री.शशिकांत बोराटे यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री. रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.५९८/२०२३,भा.द.वि.कलम ३८६,३८७, ५०४,५०७,३४ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०४ पुणे,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा पोलीस आयुक्त,श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशनचे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.बाळकृष्ण कदम, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती.कांचन जाधव, श्री.जयदिप गायकवाड, निगराणी पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,महेश लामखडे, तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक,डोंबाळे, निगराणी पथकातील पोलीस अंमलदार,सचिन माळी, सचिन शिंदे, देविदास वांढरे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवून शरीराविरुध्द व मालमत्ते विरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून गुन्हेगारांचे समूळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ८८ वी कारवाई आहे.**